



# देहऋतु

मलिका अमर शेख

मुंबई २१/०१/२०५०

सचिन केतकर

SACHIN C. KETKAR
Professor
Department of English
Faculty of Arts
The M. S. University of Baroda
Vadodara - 390 002.

# देहऋतु

मलिका अमर शेख

आंबेडकर प्रबोधिनी

Dehrutu
Poetry
Collection

मलिका अमर शेख

प्रकाशक : नामदेव ढसाळ
डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी

संपर्क :
४०४/बी, फ्लोरिडा, शास्त्री नगर,
मुंबई ४०० ०५३.

मूल्य : ६० रुपये

प्रकाशन : मार्च १९९९


मांडणी व चित्रे :
नामदेव ढसाळ, मलिका अमरशेख,
ॲमॅडिओ मॉदिग्लिआनी

मुद्रितशोधन — प्रा. केशव मेश्राम

मुखपृष्ठ : मलिका अमर शेख

मुद्रक : ॐ प्रिंट, वरळी, मुंबई ४०० ०२५

**माणसांनी दु:ख दिल्यावर**
**निसर्गानं त्याचे अपार विभ्रम दाखवून**
**दुखऱ्या भळभळणाऱ्या**
**आयुष्यावरून हलके आपला**
**विराट सुंदर हात फिरवला**
**त्या निसर्गाला हे शब्द-स्वर भेट**
**मनापासून**



# गाणी

१.

तिनं मूठ उघडली हलकेच
तिच्या घामेजल्या तळहातावर
एक लहानसा स्वर फडफडत होता.

२.

— अमलतासच्या फुलांमधून
पिवळधमक तलम ऊन
सांडतंय आसमंतात



३.

तू तलम अग्निची पात
जशी दिनरात जळावी मंद
तू बंधमुक्त स्वच्छंद जसा रानात झरा बेबंद
लडिवाळ बटा गुलजार छटा तो मृदुमायेचा हात
तो तंग चंद्र अन् हले पालवी संथ थंड जळात
ही मखमालीची शेज सखे अन् जळते दाहक अंग
ही रात चांदणी कोरत जाते प्रणयामधले रंग
तू अल्लड नवथर थरथर देही जसे थरथरे पाणी
त्या पाण्यावरला तरंग मी अन् भास वेगळा रानी
रानात बहर अंगात बहरला धुंदफुंद ते श्वास
मीलनी मग्न ते सर्प जसे की टाकतात निःश्वास
या अवघड वेळी नकोच बोलू तव ओठांची भाषा
या रानालाही कळते आपली डोळ्यांमधली आशा
असे असावे जीवन आणि असे जुळावे नाते
ही रात असावी गात स्वरांनी तुझे नी माझे गाणे

४.

तिमिरात बुडाले माझे दुःख पुराणे
मावळला सागर चांद छेडतो गाणे ।।
घन निळासावळा व्याकुळ, खिन्न, उदास
आठवतो स्मरतो श्रावणातली रात ।।
शब्दांच्या काठी बसलेला मी शांत
स्वप्नांच्या गावी लुकलुकता एकांत ।।
घेऊन भर्जरी माझ्या आयुष्याला
ती चांदरात मी प्यालो बघता बघता ।।
तो काठ नदीचा घाट रातीचा प्रहर
अन् अंतर्यामी झुरतो वेडा बहर ।।
तो घाट नदीचा काठ गुणगुणे मंद
प्राणांवर फुलला एक अनोखा गंध ।।
ज्वानीत अशी चाहूल पिसे देहात
हुरहुरते काळीज जळते खोल जळात ।।
त्या वळणावरती अजून माझी छाया
निःसंग बसे तिमिरात सावळी काया ।।
मी नाही परतलो वळणावरती माझ्या
जग धुंदीत बसले निजदेहाला माझ्या ।।
ते गाव संपले नाव संपले मिटला तो क्षण खोटा
अन् मीच विचारे मला कोण तो होता ।।
शरीराचा विझला दिवा नवा अंधार जन्मला दिठी
हा वादळवारा फिरे भरारा घट्ट घालतो मिठी ।।
या आयुष्याला कुणी छेडले नाही



ही अशी विराणी कुणी गायली नाही ।।
ती मंतरलेली रात चेटकी होती
ती छाया वेडी कुणी बावरी होती ।।
जगण्याचे अंतर कळले ना मरण्याचे
मी असाच जगलो जगणे अंधाराचे ।।
दर्यात सुटावी नाव आणि बेभान फिरावे दूर
मी निघून गेलो दूर ठेवूनी काठावर काहूर ।।
अवकाश निळे नसताना फिरलो प्रश्न विचारत खोल
प्रश्न किनारी बसले होते माझा ऐकून बोल ।।
पाण्यात निळ्या अभ्रात बुडाली नाव गर्गरा फिरे
उत्तर देता कुणी बिचारा काठावरती बुडे ।।
तिमिरात बुडाले माझे दुःख पुराणे
मावळला सागर चांद छेडतो गाणे ।।

५.

जगताना माझा किंचित् गेला तोल
तो खोल कडा अन् कळवळले पाऊल
मी वळलो थबकून देह दगड तो झाला
तो नकार अंधाराचा कुत्सित हसला
ते तुच्छ उसासे अवमानित ते जगणे
ती बंद समाधी मला वाटली दु:स्वप्नांचे लेणे
ती भेट स्वत:ची नको वाटली व्याकुळ झालो पुरता
जगणे कसले मरणासंगे बंद जाहलो आता
ही घट्ट शांतता फोडून काढत एकांताचे दगड
हे सत्य बिचारे शोधीत आले वाट किती अनघड
अन् नको वाटले नकोच सारे खेळ खरा की खोटा
पुन्हा पुन्हा ते मरण्यासाठी एक जन्मही थिटा



६.

ती अशी पहाटे लख्ख नाहूनी कुंतल झटकत येते
नितळ रेशमी किरणांमधूनी ऊन केशरी पडते
तनू तळपते वसंत होते जणू निमंत्रण प्रणयाचे
कुंतल काळे निथळे त्यातून थेंब जरासे मोत्यांचे
जर्द किर्मिजी पदरामध्ये फुले वेचूनी त्या वाटेवर
भूपाळीची ती तप्त तान जणू तळपत झळकत येत समेवर
अवतीभवती तिचे बोलणे तिचे चालणे
लटके रूसवे किती बहाणे गोजिरवाणे
झुकून किंचित कुजबुजताना लालस ओठी खट्याळ हसणे
गोऱ्या गाली बोटांनी त्या ताल धरूनी
मिटून डोळे नादमग्न ती उभीच दारी
पदराचा तो शेव चावूनी दाताखाली
जांभूळ डोळे तिरक्या नजरे सांगत काही
क्षणात भरते चंचल नेत्री काजळपाणी
क्षणात होते खिन्न सांज ती कातरवेळी
किती रूपांनी माझ्याजवळी येतच राही
देऊन झटका म्हणते तू तर पहात नाही
अशा वेडीला काय म्हणावे समजत नाही
शब्दांवाचून माझी भाषा उमजत नाही
भरून घराला जगण्यालाही तिचेच असणे
तिला न कळते शब्दांवाचून असे उखाणे

७.

तो चमचम तारा एकाकी नभी दिसला
अन् चांद एकटा भटके खिन्न जरासा
त्या हळव्या व्याकुळ काळ्या कातरवेळी
ती रात छेडते आर्त प्रीतीची गाणी
अन् मावळताना सूर्य जरासा वळला
अन् जवळ जळाच्या मिठीत जाऊन हसला
त्या कुजबुज लाटा करती अंधारात
अन् अवखळ वारा केस ओढतो त्यात
अन् कुठे सावळे घन गोंधळले फिरती
जणू चुकली पोरे उनाडणारी भवती
हा आठवणींचा थवा चालला गात
अन् काठावरती उभा कुणी तो शांत



८.

नभ झुकले खाली चुंबूनिया धरणीला
रत्नांचा मंदिल हसत मंद झिरमिळला
त्या काजळकाळ्या गर्द क्षितिजावरती
आरक्त लालिमा पसरे काठावरती
ती मुग्ध यौवना किंचित् मिटला अधर
ती सळसळ नवथर हलतो हिरवा पदर
किणकिणे मंद ते झाडांचे बिल्वर
रुणझुणती पैंजण शुभ्र जळी निर्झर
ती रात थबकली किंचित् बांधावरती
ती तृप्त शांत वेळेच्या झोक्यावरती
ते मिलन अद्‌भूत पहात होता कुणी बावरा कवी
ती नजर सृष्टीची वळते खाली सलज्ज अन् हासरी

९.

झुलते आहे माथ्यावरती
रत्नांचे झुंबर
स्वप्नालाही स्वप्न पडावे
असे निळे अंबर
एक एकटी होडी हसते
निळ्या सावळ्या लाटा
लाटांवरती झुलतो फुलतो
किरणांचा ताटवा
एक किनारा वेडा होता
सोडून दुनिया सारी
पाण्यामध्ये बुडून गेली
त्याची अधुरी गाणी



१०.

एक वडाचे झाड चिमुकले एक दिवाणा चिमणा
चोचीमध्ये घरटे होते घरट्यामध्ये एक शहाणा
एक शहाणा बसला होता विणत नदीची गती
काठावरती आले काही गोजिरवाणे हत्ती
एक कहाणी ठुमकत ठुमकत पाणी भराया आली
शहाणा झाला वेडा त्याची कुंठित झाली मती
विणही सुटले धागे सुटले चुकला तोल जरासा
घागरीत त्या अडकून बसला शहाणा झाला मासा
घागर घेऊन निघून गेली गोष्ट जरा सावळी
पाऊलवाटा मिटल्या विरल्या रात उरे जांभळी
चकित झाला चिमणा आणि वटवट करते नदी
सारे सोडून निघून जाणे जमले नाही कधी
काठावरले झाड वडाचे हसले पानात
कुण्यावेळच्या कुठल्या गोष्टी सांगे कानात

११.

हिरवे रावे परतूनी आले
वाट नदीची हसते
निळ्यासावळया पाण्यावरती
मंद सावली हलते
कबऱ्या गायी परतुनी आल्या
घेऊन काजळडोळे
राने झुलती हलती झाडे
वन हे नादावले
कुण्या कवीचे शब्द खेळती
प्रसन्न अन् हासरे
नदीतटाकी जमला मेळा
निळ्या डोंगराकडे
खुळे पोर हिंदोळे घेतो
जुन्या पिंपळाकडे
पाचोळाही फिरतो वळती
बघतो आसक्तिने
पुन्हा मी जाईन झाडावरती
होऊन हिरवी पाने
वारा हसतो कुजबुजतोही
म्हणतो गूढ उखाणे
एक आगळा प्रवास असला
रावा गाई गाणे



१२.

अजून येते दवबिंदूंना
याद फुलांची
अजून येते तृणपर्णांवर
नीज नभाची
अजून येतो वाटेवर त्या
गर्द शहारा
अजून बहराच्या वाटेवर
किती पहारा
अजून एका रानामधली
आर्त विराणी
अजून पाऊलवाट हरवते
आपली गाणी
अजून एका डोळ्यांमधली
मिटली दृष्टी
अजून एका अंकुरात त्या
हसली सृष्टी

१३.

सुन्या धरेवर अंग टाकूनी
रात एकली निजली
कुंतल काळे अंधाराचे
चांदरातीने सजली
श्यामल कोमल देह चमचमे
सलज्ज जांभूळ नयन तिचे
उंबरठ्यावर पाऊल वाजे
निळ्या सावळ्या स्वप्नांचे
हलके येतो चुंबन घेतो
प्रणयाचा तो खेळ जुना
सनातनाच्या घुमटामधूनी
घुमतो गहिरा अर्थ पुन्हा
मातीलाही ओढ नभाची
पुरूष उणा तो रतीविना
स्वप्नरातीच्या मिलनामधूनी
आयुष्य घेते जन्म पुन्हा



१४.

एक सावळे गाणे फुलते
लालस ओल्या अधरी ग
एक रात मग वाट पहाते
स्वप्न कधी ते येते ग
उंबरठ्याला नीज नसावी
अन् खिडकीला डोळे ग
वाट पहाणे असते अवघड
जीव किती तो दमला ग
जशी फडफडे वात दिव्याची
नजर थरथरे नेत्री ग
मन बावरते उडते फिरते
कधी सजण तो येतो ग

१५.

हळव्या हळदी देहावरती लख्ख चांदणी
रात माळते केसांवरती चांद केशरी
गंध अनोखा गंधाराचा गातच होता
एक भैरवी कुठे मिरवते स्वर दु:खाचा
एक देखणे दु:ख बसावे मिटून डोळे
अन् अंधाराला प्रेमच यावे अपार भोळे



१६.

स्वप्न संपले बहर संपला रात संपूनी गेली
सखे ग, वाट संपूनी गेली ॥
रान हरवले गाव हरवले
मिटल्या दाही दिशा
घुंगुरवाळा ऐकू येती
दूर स्वरांची भाषा ॥
श्वास मातीचा गंध आगळा
फुलला हिरवा मळा
सुटली गोफण एक पाखरू
पडले सोसत कळा ॥
भूल पडावी भान सुटावे
असला चकवा पडे
कुठे चालले कळले नाही
जीव कुठे धडपडे ॥
वाट संपली नीज संपली
टक्क उघडले डोळे
पहाट नाही अजूनी झाली
रात तरी तळमळे ॥

१७.

ती वाट जराशी वळली खुदकन् हसली
दुडदुडली झाडे वेडी पुढे पळाली
मी स्तब्ध उभा प्रश्नांच्या निर्जन गावी
मी विसरून गेलो कुठे जायचे काही
पारावर होते अंतर चुकवित नजरा
अन् पाणवठ्यावर एक अबोली गजरा
ती शुभ्र जोडवी एक किरण चंद्राचा
छनछनतो पायी नाद जसा स्वप्नांचा
ते शांत खिन्न अन् काळे काजळडोळे
जणू आषाढाचा मेघ जरा डचमळे
तो गर्द पदर अन् बावरलेली चाल
त्या पाणवठ्यावर किंचित् चुकला ताल
तो जर्द उन्हाचा गेंद जसा शेंदरी
गुलमोहर हसला पदराआडून जरी
तो घट्ट रेशमी देह जरासा ओला
अन् ओली मेंदी काही बोलली मला
ती निघून गेली विसकटलेला गाव
मन ठेवून तिकडे निघून गेले नाव



१८.

ते धावत आले पिसाट वादळवेडे
त्या तलवारी अन् रक्तपिपासू डोळे
ते नव्हते कुठल्या वंशाचे धर्माचे
ते पिशाच्च होते आपल्या मानवतेचे
ही मूल्ये कसली कुठली तत्त्वे गाता
या परंपरेचा कुणीच नाही त्राता
हे भूत अमानुष आपल्या अखंडतेचे
हे जाळीत सुटले स्वप्न किती एकांचे
किती शून्य ठरावे कितिकांचे बलिदान
का हक्क आम्हाला झुकते खाली मान
या पुन्हा उभारू खंडित हे मंदिर
अन् जयघोषांनी पुन्हा भरू अंबर

१९.

तिचा पदर अंजिरी झाला आभाळ आभाळ
झाला जीव तो पाखरू अन् हसे गर्द रान
तिच्या गालावर तीळ मला आठवे जरासे
कुंकवाची चंद्रकोर अन् नजरी आरसे
आरशांचा लखख पारा अन् हिंदुळले मन
तिच्या बटांवर झुले झुला किरण किरण
सारवल्या अंगणात कुठे रांगोळीची रेषा
मंद तेवत्या पणत्या अन् स्वप्नांची ती भाषा
कुठे आभास सावली कुठे तेजाळते अंग
तिचा वावर घरात जसे मंद निरांजन



२०.

माझे माझे किती म्हणू सारे ओझे येथे राही
कुडी म्हणे देह नको चित्त दुजा जन्म पाही ॥
जन्ममरणाचा फेरा असो बापुडा कपाळी
मोक्ष मुक्ति माया ब्रम्ह माझ्या दारच्या तोरणी ॥
कुठे माळू मी मरण देह मोहानं भरला
हिर्व्या पिकामंदी विळा मळ्यात फिरला ॥
असं माणसाचं जिणं जसं कापणीचं धान
मळूदळून भाकर कंच्या देवाचा निवद ॥
दारी ठेवली मी वीट झालं मरण विठ्ठल
दारिद्र्याचे पाय चेपी माझं आवुक्ष हसलं ॥

## भुईकोट किल्ल्यागत....

नजरेच्या घरट्यातली दु:ख
नख पारजत ओरडणारी दु:ख आपापल्या ढोलीतून
जखमांचे लाड करावेत
असं काही उरलं नाहीय्
स्वत:च्याच चामड्याबद्दल ही अशी अजनबी फारकत
आयुष्याला कधीच केलय् हद्दपार आपणच
आता फक्त ही रिक्त देहाची पखाल चामड्याची
उग्र गंध अस्तव्यस्त वास्तवाची
मनाची मेंदूची दार हळूहळू बंद होतायत् निर्घृण कठोरपणे
बुलंद भुईकोट किल्ल्यागत असलं की बरं अस्तय्
मग राज्य असावं अनिभिषिक्त
किंवा नुस्तीच गवत वाढलेली समाधी
दोन्हीत फरक उरतच नाही नंतर नंतर

## प्रेम अस्तं ...

प्रेम अस्तं अस्तनीत लपवून ठेवलेली वाघनखं
प्रेम अस्तं कधी कधी
मरणाचं पात्र ग्रीक नाटकातलं
जे प्रत्येकवेळी वेगवेगळे मुखवटे चढवून येतं
साळसूदपणे
प्रेम अस्ते बेमालूम मारलेली थाप
प्रेम अस्तं उडणारी म्हातारी
जिला पकडायला आवडतं आपल्याला
गुडघे खरचटत पडत धडपडत
धावतो आपण खुळ्यागत
प्रेम असतं फक्त इतिहासात लपून बसलेलं
कारण त्याचं खरं खोटं कुणीच नाही जाणू शकत
प्रेम असतं काळं अवकाश
ज्याचा थांगपत्ता लागत नाही
प्रेम अस्तं अशी अवेळ
कुठल्यापण गावच्या स्टँडवर
किर्रर्र रात्री तुम्ही पेंगळून बसताय्
वाट बघत गाडीची
न् वैतागता स्वत:वर किंवा दुसऱ्यावर
कदाचित अख्ख्या जगातच कुठच
प्रेम अस्तित्वातच नसेल
पण तरीही डायनॉसॉरच्या आख्यायिका
पसरत जाव्यात अखंड जगभर
न् नसलेलीच गोष्ट आवडावी भयंकर



असं आपल्याला आवडू लागते
प्रेमाची कल्पना न् कल्पनेतलं प्रेम
न् मनातलं शून्य खदखदून हसत रहातं
या बेमिसाल फसवणुकीवर
हा ग्रह अजून उजाडच आहे
ही माणसं अजून अमीबाच आहेत
आणि मधून पाऊस पडतो मुसळधार
उन्मळून पडावं असहाय तसा
अधूनमधून हिरवंगार गवत डोलतं
अधूनमधून होत रहातो समूळ गदगदा हलवणारा धरणीकंप
न् आपल्याला भास होतो प्रेमाचा
घाबरून आपण स्वत:ला भेटतच नाही
मनातल्या अवघड खिंडीत
आत बसलेलं कुणीतरी ओरडून सांगेल म्हणून
प्रेमापेक्षा जगणच खरं अस्तय्
जे तुम्ही जगताय् भाड्याचं किंवा उधार
तुमच्या शर्तीवर किंवा दुसऱ्याच्या
तुम्ही सरपटताय् की
अजूनही तुमचा कणा ताठच आहे
आयुष्य कोसळत राह्यलं
तरी प्रेम कसं निर्विकार अलिप्त रहातं
देवघरातल्या देवासारखे
दगडहसू हसत
महान लोकांच्या फोटोसारखं
प्रेम बसवतो आपण फ्रेममध्ये भिंतीवर
न् आपण होतो न आठवणारी माणसं
न लिहिली गेलेली कविता
आणि एक निर्मम शून्य

## कविता अजून एक

जन्माला येऊन पण
मला फुलं पानं वारा पाण्याइतकं
सहजसुंदर होता आलं नाही
माणसाला न् निसर्गाला
सारख्याच ताकदीनं भिडणाऱ्या
व्हिटमनच्या कविताइतकंही नाही
किंवा सर्वंकष क्रांतीच्या गर्जनाइतकंही नाही
किंवा पिवळ्याधमक ताटातले भरगच्च दाणे
तेही होता आलं नाहीच मला
स्वत:च्याच स्वीत्वाच्या जात्यात
भरडलं जाणं पण नाकारलच मी
माझं झालं नुस्तच एक भोत भरलेलं बुजगावणं
एकांतिक समाधीत थंडगार चिणत
मी झोके घेतेय् वाऱ्यावर डगडगत
शब्द आधीच नेलेत कुणीतरी खुडून
राखण करत ऱ्हावं असं उरलं नाहीय्
काहीच स्वत:च असं
अस्तित्व झालय् भगवद्गीतेला लोचट लुब्रा आत्मा
जाळून जळत नाही
मारून मरत नाही
न् सिसिफसच्या निरर्थक दगडासारखं



निर्लज्ज निरर्थकपणे
जगण्याचा दगड उचलतच रहायचं सातत्यानं
वर्षानुवर्षं
शतकानुशतकं
पहात रहायचं मृण्मयी डोळ्यानं
इतिहासाचं विकट हास्य
न् ऐकायच्या त्याच्या लंब्याचवड्या बाता
ज्या खाऊन पोटही भरत नाही कुणाचं
या अधम माणसांच्या जगात
कुठं कुठं उगवलेली ही मुलायम हिरवळ
उगवत रहावी
सुक्या गवतांच्या शुष्क हातांना
फुटाव्या हिरव्या फांद्या
बोटांच्या जागी नाजुक हिरवा कोंब
एवढं तरी शाश्वत मिळावं
प्रत्येक बुजगावण्याच्या वाट्याला
मग तर या
निराश्रित आभाळाचीही मी राखण करेन

# अंतराळ

मी जमीन गुंडाळून ठेवली
नीट एका बाजूला
न् आकाशात धावत सुटलो
चंद्र खूप वेगानं आलेला
पण मी अचूक पकडला एक किरणांचा खांब
न् पटकन बसलो
रात्र घड्याळाच्या काट्यांवर
टाईप करत होती टक् टक् टक्
कुठच्यापण यंत्राबरोबर बोलणं
नाकारू काय आता मी
मग हे मेंदूतून उडून काय भिरभिरतं बाहेर आलं?
चक्र, खिळे .. वायरी..
न् माझ्यातून उठून तरातरा चालता झालेला
विचार की काय?
मग माझा आत्मा कुठल्या ग्रहांच्या नाक्यांवर
पान खात उभाय्?
न् हा बुद्धीचा डास माझ्या पाठीवर बसलाय निवांत
माझं रक्त पित त्याचं काय?
सामाजिक प्रगतीचं सर्टिफिकिट
माझ्या बॅगेत आहे त्याचं काय करू?
सारेच संदर्भ कोसळत जातात धडाधड
जरा जरी गेलं वातावरणाबाहेर तरी
मग आजवरचं हे ओझं कुठं टाकू?
परंपरा संस्कार संस्कृती इतिहास
क्लोनिंग, अणुबॉम्ब, सिव्हिलायझेशन वगैरे वगैरे
समष्टीचं सिलिंडर न जाणिवेची कॅप्सूल करता येत नाही



हे एक बरय्
केवढं तरी कोरं आहोत आपण
आपलच झालय् एक अवाढव्य कृष्णविवर
हे एक अजबय्
माणसं गाड्या रॉकेट बिकेट
क्षेपणास्त्र सगळं लटांबर
आडवं अधांतरी तिरपं टांगलेलं
आणि वेड लागल्यागत गोल गोल फिरणारी पृथ्वी
फसवणूक ही की ती
न् मग दोन्हीकडे निष्कर्ष शून्यच का?
सारं अंतराळ विकट शांततेत हसतय्
अक्राळविक्राळ
खेळतय् धावतय् भन्नाट
एकमेकांच्या मागं धावत फिरत गोल
मी पण धावतोय पुन्हा
गर्गर फिरत मी पण झालोय एक अद्‌भुत ग्रहगोल
अपार निर्जन निर्मम मौनातला
समजूतदार नियामिताचं वर्तुळ
एक अहेतुक घडवाघडवी
अनेक दुधाळ आकाशगंगा ओलांडत
मी दूर चाल्लोय्
गलोलीतून सुटणाऱ्या दगडासारखा
अमानुष गतीनं
कुणीच जन्मून वस्ती करू नये म्हणून
नाहीतर मी ही होऊन जाईल
कुरूप केविल
मानवी टिंबांच्या उपद्रवांना घाबरून
मानवाइतकं कुरूप
काहीच नाहीय् अवकाशात हे खरंच!

## एक हिरवागार थंड तिरस्कार-

एक हिरवागार थंड तिरस्कार
तरंगतोय् रक्तावर
पाशवी सर्प वळवळत रहातो
अवयवांच्या जंगलातून फुत्कारत
किती छानय् हे एकांतिक स्मशान
जिथं सर्वदूर भावनांची थडगी शुभ्र पांढरी
न् कुठे कुठे कवितांची रोपटी
आभाळाचा पक्षी वाकून बघतोय् प्रतिबिंब
या चकचकत्या नकाशाच्या कवटीवर
भांग पाडलेलं रान
बडबडत रहाणारा वारा
मरून गेल्यावर पण हाडातून वहात रहातो
न् मरणांतिक तक्रारी वाजत रहातात
घरांच्या न् कर्तव्याच्या किंमती
वाढत असतात जगात
आयुष्याहून जास्त
किंमती चूपचाप चुकवत जगत रहातं जग
आपल्याला काहीच म्हणायचं नस्तय्
मरणाचं शेत झुळझुळ वाढतं
चमकतं पिकूनधम्म
न् आपण त्या मरणाच्या एकेका दाण्यावर
प्राणांतिक लुब्ध मोहित
की कापण्याची वेळ टळून जाते
न् पीक मरणाचं वाढत जातं आपल्याही अंगावर
आपण घेतो एक दुधारी विळी
कापून काढतो तण मरणाचं पीक
आता ओसाड उजाड आयुष्याची
सुन्न काळीभोर माती
न् आपल्याला पेरायला आपण शिल्लक नसतो
तेव्हाची ही रिक्त निष्फळ गोष्ट.



## खडक चेहरे सर्वत्र

खडकचेहरे सर्वत्र जवळपास दूरवर
हवा पाणी घट्ट मांसल बाईच्या देहागत
मेंदू आतडी शुभ्र लखलखीत
पारदर्शक चामडीची काच
रबराची टाळू, तोंड जीभ दातही
खडक चेहरे अस्ताव्यस्त निश्चल
बदल आणि गती
गोठून गेलय् घट्ट मुठीत काळाच्या
जन्मत नाही शब्दांचा मासा
चंदेरी बुडबुडे सोडणारा
किंवा अनुभवांचा जखमी चंद्र
नाही उतरून येत या घट्ट डबक्यात
समुद्रातलं पाणी पाय उचलत
कुणाच्यातरी डोळ्यात रहायला निघून गेलय्
पायाखालच्या जमिनीचे पातळ तुकडे
कुणीतरी टाकलेत चावून चोखून
खडकचेहरे उगवलेत
या हताश अरण्यात नि:संग विरक्त वाळू
खडकशरीर ज्यावर
चेतना आपटून परत जाते आसमंतात
आकाश अजूनही निर्विकार
वेळेला सोलत रहाणारा एक वेडा
फक्त दूरवरून नकार घंटा वाजवतोय्
खडकचेहरे न विरघळता ऐकतात
आजकाल जन्मतात खडकचेहरे न् वाळू उत्तर न देणारी

## स्वातंत्र्य हे अजून कुठल्यातरी साखळीचं नाव

भिंत छत जमीन यामध्ये ठोकून बसवलेली मी
स्वातंत्र्याचे लहान लहान गोल आरसे
माझ्या कपड्यावर
खूप लहानपणी माझे हात मऊ गरम भाकरीसारखे होते
आणि स्वप्नांना चावून खाता यायचं
आणि अचानक एक अनोळखी परकी स्त्री
माझ्यात रहायला आली
विचारांचे गरम कपडे
वासनेचं निरर्थक झाकणं तिनं बसवलं देहावर
मी घुसमटले
सगळ्याच बायकात रहायला येतात या परक्या बाया
स्त्रीत्वाचे अर्थ सांगत
मग रहायला येतो एक चकचकीत आरसा
मग एक दिमाखदार फसवणूक
मग दु:ख मग आणि खूप काहीबाही
येतच रहात आपल्यात
छटेल अर्थ निरर्थक भावनांची पाहुणगर्दी
साध्या साध्या सुखांची निरागस पिल्लं
आपलं होऊन जातं एक मोठ्ठं घर
किंवा मग नुस्तीच अडगळीची खोली
स्त्रीत्व होऊन जातं एक भला थोरला पाळीव कुत्रा
इमानी करुण डोळ्यांचा



स्वातंत्र्य हे अजून कुठल्यातरी साखळीचं नाव असतं
न् नात्यांचे अजब बिल्ले लटकावून
स्त्रीत्व हिंडत या खोलीतनं त्या खोलीत
प्रत्येक चुलीवर शिजवली जातात
कंटाळ्याची कालवणं
बायका शरिर स्वच्छ करतात
कोंबडी सोलावी भर्रकन् तसं
कपडे धुतात घर साफ करतात स्वेटरं विणतात
खूप काय काहीबाही करत रहातात
स्वातंत्र्याच्या आरशात काहीच दिसत नाही
स्त्रीत्व : जे खाऊन टाकतं स्त्रीला हळूहळू चवीनं
ज्याला हरकत घेत नाही कुठलीच स्त्री!

## एका कोपऱ्यात ती

एका कोपऱ्यात ती
दुसऱ्या कोपऱ्यात स्वातंत्र्य
एका टोकाला ती
दुसऱ्या टोकाला शरीर
एका किनाऱ्यावर ती
दुसऱ्या किनाऱ्यावर शब्द
कुठल्याच पद्धतीनं ती स्वत:कडे परत आली नाही
अंतर हसत होतं सिग्रेट फुंकत
आयुष्य थकून खिन्न हसत
तीही हसली ओठ विलग न करता
विकट
जे ऐकलं नाही कुणीच
प्रश्न आणि उत्तरात फरक असतो तरी काय
दोन्ही शेवटी एक शांतता असते निरर्थक
प्रत्येकजणच उभा असतो या रेषेवर
आणि सत्याचं एक लहानसं मूल
ढोल वाजवत उभं असतं खाली
जे ऐकत नाही कुणीच
एक निरपवाद आसक्ती विव्हळत रहाते
जखमी श्वापदागत
एका अखंड असह्य चाकोरीत चिणून टाकतो आपण स्वत:ला
उकडत ठेवतो स्वत:ला आधणावर
व्यक्तीकडून समष्टीकडे वळताना
आपण विसरतो जगायला
आणि आपणही परतत नाही स्वत:त मूळचे



## जमीन चालत जाते...

जमीन चालत जाते माझे पाय ओलांडून
आंधळा वेळ धक्का मारून जातो
दिवस दिवसभर जुगार खेळतो माझ्याबरोबर
कंटाळा मला पिसत रहातो
माणसांच्या लगोऱ्या रस्त्यानं रचून ठेवल्यात
बायका मठ्ठ बधीर आपापल्या विहिरीत
गपगार
शिळ्या अफवा तळून देणारी वर्तमानपत्र
घरात जन्म घेत वाढणारे बाळसेदार तणाव
पाळण्यात पाय झाडत रडणारे प्रश्न
हे भौतिक सुखाचे पोल्ट्रीफार्मस्
आणि मग येणारी वैश्विक भोवळ थकलेपणा
एक लख्ख अनुभव येतो उभा रहातो
न्याहाळतो पहातो
टोचतो मला उलथपालथ करतो मी गप्पच
कोणाय् जिवंत? एक मूल येतं विचारतं काठी आपटत
मी हात वर करत नाही
तशीच पडून रहाते गप्प...

## निर्बुद्ध क्रूर हसणं चाकूसारखं थरथरत

रात्र अगदी गच्च भरलेली अलगद
काचेरी शहरात
अचानक माझा देह हिंदकळला
न् चांदणं सांडलं
अचानक बायका आल्या
पूर्ण रात्र घटाघटा प्याल्या
मग त्यांनी आपापल्या दु:खाची कात टाकली
शहराला विळखा घातला
शहर शांत भलामोठा श्वास टाकत उसासत
बायांनी हलके हलके गिळून टाकलं शहराला
रंगीत लालबुंद नखांनी त्यांनी
चाचपले प्रत्येकाचे आत्मे
त्यामुळं कुणीच तक्रार केली नाही
सगळेच जण झालेत स्लिपिंग ब्यूटी
न् राजकुमार कुठलापण येणार नाहीय्
दिवस भांबावून नरवं खात उभा
समुद्रावर थकव्याचा एक मंद तवंग चकचकतोय्
न् हे सांडलेलं चांदणं तर वायाच गेलय्
रोजच नवीन चांदणं
न् नवा कोरा रिता देह कुठून आणायचा?
बायका हसल्या
हवेत एक निर्बुद्ध क्रूर हसणं
चाकूसारखं थरथरत घुसून थांबलेलं



## दोघांची कविता

जर्द निळ्या चांदण्या अंगावर घेऊन
विहरणारं पिवळं फुलपाखरू
रानटी गवताफुलांचा परिसर
किती पळावं या शिवारातून
कोवळे लुसलुशीत चुबुक काटे
डसतात पायाला
कितीतरी दिवसांनी लख्ख उजाडलेलं
भूतकाळ पालीच्या शेपटासारखा तुटून पडतो

भविष्यकाळ!
भविष्यकाळ रांगत येतो दुडूदुडू
आपण सावल्यागत लांब पसरतो एकमेकात
एक उष्ण दिलासा श्वासात सांडतो
उन्हासारखा
आपल्या नजरा एकमेकांचे हात धरून
धावतात फुलपाखरू पकडायला
आसमंत तुटून खळाळत येतो
इच्छांचं लखलखतं झुंबर
कवितेचं प्रतिबिंब केवळ नितळ स्वच्छ
ज्यात सारं जग दिसतं नुक्त जन्मलेलं.

**नामदेव+मलिका**

## दोघांची कविता

मे झटकतो अंगावरले शुभ्र कफन
अजून थोड्या दिवसांनी जून
त्याच्या अंगावर पाऊस सांडेल
झाडावरली पानं जसे किडे खाऊन टाकतात
तसेच हे लोक पुस्तकांची पानं खातात
अंतरंगात असा विषाद भरलेला
आज पुन्हा आपलं आयुष्य
जड पावलं टाकत घराकडे परतेल
आपण कुठले कुठले दरवाजे उघडायचे
किती काळ तिष्ठत थांबायचं?

प्रश्नांची पानं पिकून गच्च पाचोळा सळसळीत
ऋतुंची नाव मोजून
आपण दूर निघून जाऊ
तिथं तरी आकाश निरभ्र असेल ना?
उघड त्या बंद मुठी
आणि झळझळू दे
तुझ्यामाझ्या सहवासातला निखळ क्षण
कंटाळ्याच्या थांब्यावर थांबू नकोस इतका वेळ
न् माझे किनारे तू तुझ्या
डोळ्यात घेऊन का उभा आहेस?
तुझ्या नितळ पाठीवर
मी लिहू काय एक दीर्घ कविता
ऋतुंचे रंग किंवा मीही तुला दिसत नाहीय्
मी कोसळतच जातेय्
न् तू मोजतोयस् अर्थहीन शब्दांच्या चवचाल चवल्या
गवताळ मार्गावर दबलेली रेषा
उमटावी स्पष्ट
न् वाऱ्याचा आवाज यावा
इतक्या गतीनं तू माझ्यातून आरपार निघून जा
तरी तू माझ्यात असशील
ऋतू दिशा रंग गंध या इतकाच आदिम प्राचीन अपरिहार्य
**नामदेव+मलिका**



## तीन कविता

१.
एक निळं आभाळ
एक कबूतर
एक पतंग
तिघंही निरभ्र संथ उडतायत्
एका मुलीच्या नजरेत
२.
झाडं विणत बसलय् पाखरांचे पंख
पंखावर पुन्हा एक उमलते पालवी
न् त्याच्यावर एक लहानसं आकाश
आकाशात पुन्हा खूप पाखरं
झाडाला शोधणारी
३.
रात्र तळपते बायांच्या नजरेत धारदार
सूर्य मावळतो नितळ चामडीवर
स्वप्नं कुजबुजतात
बाया कपडे घालून फिरतात शहरात
पुरूषांच्या शरीरातपण
आणि एकमेकांच्या नग्नपणाला कुणी वाचत नाही

## बुबुळं आणि त्याची मिती...

बुबुळाच्या पांढऱ्याशुभ्र
चमचम काचेरी ओल्या जमिनीवर
गर्रकन् गिरकी घेणारी
माझी आत्मभोर प्रतिमा
लहान बिंब
टिंब प्रकाशाचे
काळ्याभोर पिंगट
वर्तुळात जाळीच्या
अनेक मींचं प्रतिबिंब
रेषांवरून उड्या घेत अल्लाद
स्वप्नाच्या आभासमय तंतूत
अडकून कधी ओलांडून
मी खूप अलवार नाचते त्याच्या बुबुळावर
तसं प्रत्येकाच्या डोळ्यात अस्तं एक वेगळं जग
कुणाच्या डोळ्यात तुटलेल्या काचा
कुणाच्या डोळाभर नुसतीच आग
कुणाचे डोळे एक अवघड खडकच
तर कुणाचे डोळे अथांग समुद्र
किंवा निद्रिस्त ज्वालामुखीची कड
बुबुळं आणि त्याची अगम्य लिपी
बुबुळं आणि त्याची मिती
डोळे हिरवागार शापित डोह खोल आर्त
ज्यावरल्या गर्द थंड तरंगत्या



शेवाळावर आपण लुब्ध होतो
डोळ्यात साचलेल्या मीठाळ पाण्यामध्ये
आपण विरघळतो सहजच
डोळे असतात क्वचित खूप खरे
जे ओलसर होतात भावनेच्या एका घावासरशी
डोळे असतात एक लहानसं कठोर सत्य
ज्यावर आपण अनेकदा घसरून आपटतो सपशेल
किंवा दु:खाचे मुकुट माळून अहंकारात
ताठ उचलतो मानदेठ
बुबुळांमध्ये क्वचित कुठल्या
लहानसं तान्हं जनावर अस्तं
ओल्या गर्भाशयात तरंगावा गर्भ तसं
डोळेच जन्म देतात अवघ्या सृष्टीला
सारं काही जिवंत नाचतं
डोळे तरूण होतात निसर्गासारखे
डोळ्यातलं ऊन कोवळं होतं
चांदणं पसरतं डोळ्यातून डोळ्याकडे
न् नजरेच्या चांदावल्या झुल्यावर
मी झोपी जाते गाढ
बाळमुठी चोखत आयुष्याच्या

## निरर्थाच्या भेदक अनभिज्ञतेत...

निरर्थाच्या भेदक अनभिज्ञतेत
चिणलं जात असतानापण
स्त्रिया शहरातल्या
पूर्ण वाढलेलं लहानसं मूल झालेल्या
पुरूषांचे रंगीत खुळखुळे वाजवत
त्या हसत रस्त्यानं चालू लागल्या
जाणिवा सर्पकातेसारख्या
चकचकत टांगलेल्या दुकानातनं
आणि कोरीकरकरीत शरीरं
सर्वत्र तरंगत
स्त्री-पुरूष आदिम काळापास्नं
एकमेकांच्या शरीरातनं
आरपार जा-ये करतात
न् रिकामे हात हलवत
परत येतात स्वत:त
आसक्तीची पोकळ हवा
फुप्फुसात येऊन निघून जाते
माणसं वाजवून पाह्यली तर
त्यातून कोणतच संगीत किंवा सूर येत नाही
बायांची शरीरं असतात सोनसळी चमकते पिंजरे
कुठल्यापण लेन्समधनं पाह्यलं
तरी कंटाळ्याशिवाय
कुठलीच फ्रेम दिसत नाही स्पष्ट
वेळेतनं भुळभुळ गळणारं शहर
आणि हे लांबलचक रस्ते
का हसतायत् माणसांना
उन्हाचे फसवे आरसे
उंच तिरपे आडवे उभे
कुठूनही गेलं



तरी एक प्रचंड शून्याचं हसू ऐकूच येत रहातं
त्याच काय करावं?
विश्वंभर अंतराळात
प्रश्नचिन्हं पसरल्यात
न् माणसं देतायत् निद्रेला उत्तर
एकमेकांवर ते प्रयोग करतात
ते हताश होतात
किंवा भौतिक सुखात दीर्घबधीर
यापलिकडचे पर्याय त्यांना अद्याप सुचले नाहीयत्
जे जगत रहातात चिवटपणे झुरळाच्या
किंवा मरतात किड्या-चिलटांप्रमाणे
आपापल्या जागा बदलतात
आरोळ्या ठोकत
तत्त्वज्ञानं मांडत लढाया करतात नियम नसलेल्या
एकमेकांना कळपानं जपतात
एकमेकांना कळपानं मारतात
त्यांच्या चालीरीती अजब वाटतात मला स्वत:ला
ते स्वत:च स्वत:ला छळतात
स्वत:चीच दया येऊन ते धर्म निर्माण करतात
बायांना पुरुष
न् पुरुषांना बायका आलटून पालटून वापरतात
शब्दच्छलाचे म्युझियम्स् उघडतात
इतिहासाला भोत भरून ठेवतात जपून
भविष्य अस्तं फक्त बँकेच्या पासबुकात
किंवा सेफडिपॉझिट लॉकर्समध्ये
मला हसू यायला चेहरा नाहीय
तरी पण माझा
अवघडलेला वळ्यांचा मेंदू पांढरंशुभ्र हसू
खदखदून हसतो
हसतो रहातो विकट विकल केविल

## व्हीनस

तिला नाहीयत् हात
        माझ्यासारखेच
न् नजरही ठार मेलेली
ती उभीय् शोकेसमध्ये स्तब्ध गोठून
        माझ्यासारखीच
संस्कृतीचं दगडी वस्त्र
तिनं घट्ट धरलय् पायात कसबसं
न् दगडी ओठ
घट्ट मिटलेत
        माझ्याप्रमाणचं
शहरातल्या बायका वितळतायत्
        घडतायत् व्हीनसच्या मूर्तीत
एक आदिम स्त्री
पाषाण आरोळी ठोकते
आणि शहर कोसळून पडतं
तिच्या पायाजवळ
आभाळ विस्कळीत.



## छापल्यावर कविता...

— छापल्यावर कविता वेगळीच दिसते
म्हंजे माणूस शब्दात
संस्कृतीत हिंसेत इतिहासात जसा असतो
पण जन्माला येतो
तो निव्वळ मासाचा गोळा हलणारा
जन्माला येतो आपण
म्हंजे आपण छापलेच जातो एकप्रकारे जगात ना
कुठला रोल
कुठले शब्द
भूमिका कायाय्
स्त्री की पुरूष
कुठली जात कुठला देश
उजवे की डावे
नागडे की उघडे
की नुस्तेच मुखवटे
आपल्याकडं कसलच स्क्रिप्ट नस्तय्
आपण आपले दुसऱ्याच्या इच्छेनुसार
छापले जाणारे शब्द
न् तरीपण आपण केवढे अभिमानात
हिंडतोय् जगात
उसनं चिरगुट लावलेलं धडुतं आयुष्याचं
खांद्यावर टाकून

## साल्वादोर - दालीच्या चित्रासाठी एक कविता

इथंतिथं पडलेले हे नकार
शब्दातनं सांडलेले हे चेहरे
ही मेलेली पापणी
सारं वठलेलं
न् तरीही काळ जिवंतच
त्यावर ओठंगून पडलेला
दालीचं घड्याळ लांबतच चाल्लय्
वेळेची जीभ ओलसर वळवळणारी
न् तरीपण इच्छांच्या या लालकाळ्या मुंग्या
जिवंतच कशा
जगतय् कोण?
काळ? की आपण की निराकार अवकाश?
ही श्वासांची धडधड
की घड्याळाची टिकटिक ऐकतोय् आपण
आदिम कोट्यावधी वर्षांची प्राचीन
त्या भल्यामोठ्या पापणीआड कायाय्?
पुन्हा एक घड्याळ
एक वेळ एक शांतता
की मेलेला अश्रू?



## निरोप

शेजारच्या मुलीचं
लग्न झालं नुकतच
जाण्याआधी ती वळली घुटमळली
तिनं लावलेल्या झाडाखाली
थांबली किंचित वाकली
रंगलेल्या नखानं भरभर माती उकरली
जड हलके चावणारे बोलणारे
गूढ मौन गंभीर
अंगावर धावून येणारे
आदिम न् हिंस्र
संरक्षक न् सूक्ष्म
अक्राळविक्राळ न् प्रश्न विचारणारे
सारेच विचार तिनं पुरून टाकले
मेंदूच्या पांढऱ्याशुभ्र वळ्या उलगडल्या
मग त्वचा जाणिवेसकट
मन संवेदनेसकट
तिनं पटपट गुपचूप पुरून टाकलं
तिच्या न कुणाच्याही नकळत
आणि मग एक कोरी जागा
श्वास घेत चालू लागली
पावलामागनं पाऊल.

## दाली – नार्सिसस आणि एक कविता

दगड विरघळतोय् दगडात
स्फटिकपाण्यात विरघळतं बिंब नार्सिससचं
अचानक उठून बसते दगडी आसक्ती सावळी
पाय मुडपून स्वत:लाच प्रचंड बांधत चाललेला
हा एकांत
हे आत्मरूपाचं अभेद्य जडपण
कोषातनं बाहेर आलेली
ही अवघड कठीण पाषाणकोमलता
नार्सिसस
आता उभा राहील
केव्हाही कुठल्याही क्षणी
आणि मग हवा पाणी माणसं शहरं
सार जगच होऊन जाईल नार्सिसस
एकांतिक शोकांतमग्न
एकमेकात पाहतील आपआपला चेहरा
मग चेहरे होतील पाणी किंवा आरसा
ज्यात प्रतिबिंबावाचून दुसरं काहीच दिसणार नाही कुणाला
ते गिळत रहातील एकमेकांच्या बिंबाला
आत्मप्रेमाची फळं
आत्मतुष्टीचे इतिहास लिहिले जातीलही कदाचित
एकमेकात पाहत राहतील वाकून
न पेलणाऱ्या अमोघ सुंदर कवचात
न् कवचाबाहेर
आपण
सारेच
नार्सिसच!



## कुठल्याही क्षणी कोसळेल...

कुठल्याही क्षणी कोसळेल असं हवेचं झुंबरं
झाडांचे केविल तुरे काळंवडलेले
लयभोर पाण्याचे थयथय थवे
देहमहालात वावटळ विकारांची
शांतता डचमळतेय् अवकाशाच्या ओंजळीतून
शब्द झालेत संन्यासी अलिप्त निर्विकार
शून्याच्या गढीत बसलेली माणसांची टिंबं
अनघड प्रश्नांची सर्वदूर वळणं
आणि प्राक्तनाचं तरसहसू
कुठल्या निर्व्याज वाटेवर
आपण अस्खलित राहू
क्षितीजाची प्रत्यंचा ताणून
उभा असलेला इतिहास
न् मृण्मयी मातीचं मौन
सगळेच अंकुर भयकंपित
उगवायला घाबरणारे
नजरबंदी करणारं ऊन
हे सारच कसं भीषण सुंदर आकर्षक
एखाद्या प्रच्छन्न कवितेप्रमाणे
अंतराचे अंतरे ओलांडून
आपण जाऊ शकू आयुष्याच्या समेवर
सहजगत्या गतीनं
पावसाच्या काळ्याभोर ढगात
लपवून ठेवलेलं तुझं हृदय न् माझी स्वप्नं
त्यांची हिरवीगार पिकं डोलतील
आणि मग पुन्हा एकवार जग निवांत झोपेल
शांततेच्या बाळमुठीत

# झाडांचे दोन हिरवेगार देह...

झाडांचे दोन हिरवेगार देह
सळसळत डोलणारे
त्यांचे फांद्यांचे प्रसन्न हात हलणारे झुळझुळ
उंच डोक्यावरले कोवळे तलम तुरे
फुलंबिलं काही नाही
तरीही मनसोक्त आनंदात समाधानी
डोलणारं झाडांचं तुडुंबतृप्त जोडपं
नृत्याच्या लयबद्ध तालावर हवेच्या
एकमेकात मग्न पानांचे लवलव हात
गुंतवून एकमेकात
ती दोन झाडं कुजबुजत हसत राह्यली
सावळ्या सावल्या फेर धरत राह्यला
त्यांच्या हिरव्या श्वासांचा उग्रगंध
हवेत लटकणारी
शहराच्या तंग छतावरली
वासनेची हिरवी फळंही पिकू लागल्यात
एक वासंतिक आत्मोत्सव झाडांचा
झाडांमध्ये नसतो मेंदू की कुंडलिनीतला मोक्षाचा व्यूह
न् तरीही झाडं असतात आनंदी
देहभोग नसतो झाडांना
न् तरीही त्यांची निर्विवाद समाधी किती शांत
फक्त जमिनीच्या खूप खोल आत हृदयात
झाडांची मूळं थरथरतात





जमिनीला कवेत घेऊ पहाणारी मुळं
न् आभाळमिठी घालणारे हिरवे हात
याच्यामध्ये कुठतरी पाचोळा सळसळतो
मंद मूकपणे
झाडं मूळ न् पाचोळा या दरम्यानचं जग
म्हंजे अस्ते एक फसवणूक
एक खरं जग पोपटी पानाआड
एका अंकुरातच दडलेलं अस्तय्
न् झाडं हसतात मंद तृप्त आश्वस्त जगाला जोजवत

## क्षण...

जपमाळ घेऊन बसावी
तसे हे जख्ख म्हातारे पांढरे क्षण
मी सरकली जातेय् मण्यांप्रमाणे
थंडगार अलिप्त वेळेच्या बोटातनं
केवळ सवयीनं निरर्थक





## घनगर्द सावली...

घनगर्द सावली आधिभौतिक करूणेची
हे थंड ओल्या हिर्व्या इच्छांचं गवत
की माझच प्रतिबिंब
न् हे प्रशस्त प्रसन्न उबदार काय आहे?
घर की तुझं शरीर?

## जखमा खोडरबरनं पुसता येतात...

जखमा खोडरबरनं पुसता येतात
असं काही कधीच वाटलं नाही
पण साऱ्यांचाच तसा
विश्वास दिसतोय् बेमिसाल अढळ
पूर्वी हात पुढं केला की
माणसांची लयबद्ध स्पंदन कळायची
आता फक्त एक रिक्त कोरेपणा
एक जहाँबाज दांभिकपणा
न् काटेरी शब्द
खूप वेळ बागेत हिंडलं
तरी पायाला मातीच लागावी
तसं खूप माणूस चालूनपण
हातात उरतात हताश शून्य
हे प्रदर्शनातले शब्द
वाक्य न् संवादाची म्युझियम्स
जमिनीवर न् जमिनीखाली
मुरत ठेवलेली माणसं
न् तरीही प्रत्येक बहरात
नव्या पिंपळपानात कोवळ्यातांबूस
लपून राह्यलेली माणसं
हे रूपांतर छान वाटतय्
मोराच्या पिसाऱ्याभर डोळ्यांसारखे
असंख्य डोळे मी उघडतेय् आसमंतातून
जग उघडलं जातय् हळुवार
भल्या मोठ्या शिंपल्यागत



जगभरातल्या जखमा न् वेदना न् दु:ख
यांचे मोती होणार नाही हे ठाऊकाय् मला
पण माणसं भाकरीइतकी आवश्यक न् चविष्ट
व्हावीत जी संपणार नाहीत अनुभवून
माणसं जी ओंजळीत धरून
जपून नेतात दुसऱ्याच्या वेदना
न् जखमांना 'ममी' बनवून
बांधत नाहीत अजस्त्र पिरॅमिडस्
माणसं एकमेकांच्या डोळ्यात शोधतात
नवी सकाळ
तरीपण जखमा पाऊस न् आयुष्य
यापासून आपण वाचू शकत नाही
केवळ डोळ्यांच्या आडोशाला जाण्यानं



## मादी...

गर्भ रेशमी गर्भार भारलेली
गर्द गार हिरवी केळ
नखशिखान्त मादी
हळव्या मवाळ अळवाजवळ
मोती थेंब झुलतात
नवतीच्या अंगावरले टपोर
लख्ख नितळ कोवळं न्हाणं
त्यावर घडलेली अनाघ्रात नाजूक देहवळणं
ताशीव उष्ण तकतकीत
उन्हाच्या तलम त्वचेगत
वलाणीवर हलणाऱ्या बोलावणाऱ्या



सदऱ्याच्या पांढऱ्या धुवट बाह्या
काहीबाही कपड्यांचे स्वल्पविराम अर्धविराम वेलांट्या
काना मात्रा टिंब चिन्ह प्रश्नचिन्हं
गूढ लिपी नागर बेमतलबी
केळ हसत नाही रूणझुण प्राजक्तागत
पानं कासाविस
ओठंगलेले देठ
आदिम मादी
सनातन वेदना असीम
खुणा अस्तित्वाच्या
अनंताच्या फांदीवर चैतन्याचा काळा कावळा
विचारतो सतत
निवदाचं पान कुठाय्?
निवदाचं पान कुठाय्?
अळू हलवतो मान हळूहळू
आरस्पानी मोत्यांची माळ हलते मंद
रान सावध स्तब्ध सुईणबोटांनी चाचपत
सळसळतो पिंपळ लगबग जाणत्या म्हातारीगत
उंच किरट्या सुरात हिर्व्या
शेवगा मारतोय् मोठ्या बाता
रस्त्याच्या फटाकड्या लायटीला
अंगणातल्या अंगणात
रांगोळी धरते रिंगण
घर खेळत
गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या
दिवसभर चांदणं
बरसतच रहातं अशावेळी
टपटप टिपूर
टपटप टिपूर

## एखादी चिडचिडी जखम...

एखादी चिडचिडी जखम
ठणकावी सतत
तसा तुझा माझा संबंध
खूपच ताणले गेलो
तरी तुटलोच नाही आपण
सगळी नाती
सगळे विसंवाद तुझ्यामाझ्यातून
वादळागत भणाणत गेलेले
प्रत्यंचा ताणून सोडलेल्या
अमोघ न् तीक्ष्ण
बाणागत आपली आयुष्य गेली सणसणत
न् वेध घेतला त्यानं आपलाच
तुझ्या माझ्यामध्ये
हे शब्दांचं कोरं अवकाश
माझ्या शब्दांनी स्पर्श केल्यावर
तुझा स्पर्श होतच नाही आताशा
एकेकटी क्रूर दोन बेटं जवळजवळ
न् तरीही खूप लांब
विराट एकटेपणात मग्न



## इच्छांची कासवं मात्र हळूहळू...

क्षितिजरेषेवर तोल सावरत कसाबसा
सूर्य संभाळून उभा
एकाक्ष चंद्राला डोळा मारणारे
कवी न् बाया
लाटांचे कामविव्हळ हात
गोंजारतायत् किनाऱ्यावर पडलेल्या शहराला
न् माणसं कधी शिडं होतात कधी बोट कधी उंदीर
बायकांची एकेकटी बेटं
निर्जन वैराण सुन्नाट
असंबद्ध जंगली जाणिवा भाले फेकतात
दगडी संवेदनांचे अजूनही,
वासनांच्या गुहेतून बायका देतात
आदीम आरोळी
आसमंताचं भांडं डगमगून फुटतं
कचकड्याची माणसं भयभया धावतात तुटत
मुठीत पकडलेल्या किटकासारखी
आयुष्यच्या आयुष्य होतात असहाय
इच्छांची कासवं मात्र हळूहळू
शहरामध्ये बेटावर किनाऱ्यावर पसरतात
पडून रहातात वर्षानुवर्ष संथ
माणसांना हसत मंदपणे.

## कापालिक यौवनाचे हे तांत्रिक...

कापालिक यौवनाचे हे तांत्रिक
भूतभविष्याची शुचिर्भूत राख
आणि कमंडलूतलं तेजाबी पाणी वासनांचं
कुणी सांगितलं माणसं संपतात
फक्त चितेवरच जळून
तडकत्या कवट्यातून उडालेल्या इच्छा
न् शुभ्र हाडातून बाहेर पडणाऱ्या
भुळभुळ मोहाच्या मुंग्या
खोबणीतून डोकावणारं
भोगाचं चिरंजीव घुबड
अवयवांचं मांडलेलं यंत्र
चट्चट् जळणाऱ्या केसांचा उग्र नर्कगंध
मासपेशींच्या लखलखत्या ठिणग्यांचे
होतायत् काजवे
आपापल्या चितेवरून मृतदेह
उठून बघतायत् पिंडाकडे
भुकाळ नजरेनं
कुत्र्यानं चघळावं निवांत हाडूक
तसं मरण चघळत रहातं माणसांना
मोक्षाची चेटकिण दबा धरून बसते
कुंडलिनीमध्ये गुपचूप झोपलेला आत्मा
उठून डोळा मारतो
भौतिकतेची भुतं
न देहातली असंख्य जनावरं
येरझाऱ्या घालतात पिसाळून
न् दुनियेच्या या गुलजार बागेत
जगण्यामरण्याचे सोहळे
एकाचवेळी आलटूनपालटून होतच रहातात साजरे
माणसांना फसवत निर्दय सहजपणे.



## घनघोर उदास एकांताच झाड

आभाळाचं अजस्त्र कासव
संथपणे सरकत होतं
ढगांचे लुसलुशीत थवे टिपतायत् ऊन
घनघोर उदास एकांताचं एकच झाड
उगवून आलेलं माझ्यातून
आणि पाऊस तर अजून कोसळतच नाहीय्

## लोक परतत होते घराकडं...

लोक परतत होते घराकडं
जसे हरलेले सैनिक परततात आपापल्या छावण्यांकडे
बायका उबवत होत्या घरं
मुलं जी लहानपणीच हुशार असतात
गुलाम इसापासारखी
चाकोरीची नाळ
हळूहळू होत जाते साखळदंड त्यांच्यासाठी
न् तरीही सगळे चुपचाप झोपून जातात
आपापल्या दु:खाच्या मिठीत
घरच्या घर
शहरच्या शहर
देशच्या देश
गेलेत संमोहननिद्रेत
आणि आज्ञा पाळतायत् फक्त प्रश्नांच्या
न् भविष्याचं माकड दात विचकून हसतय्
छातीवर हात आपटत
उड्या मारत.